# मे. दिवाणी न्यायधिश साहेब ('क' स्तर) न्यायालय, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड

Exh-1/B

रे.दि.दा नं. /2026

वादी :— नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे, वय 52 वर्षे, धंदा शेती
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड
ह.मु. रा.उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

विरुध्द

प्रतिवादी :— 1. गोविंदराव पिता नामाजी नागरगोजे
वय :— 95 वर्षे, धंदा :— शेती
रा. उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

2. सिंधुबाई भ्र. गोविंदराव नागरगोजे
वय :—76 वर्षे, धंदा :— घरकाम
रा. उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

3. मधुकर पिता गोविंदराव नागरगोजे
वय :—40 वर्षे, धंदा :— शेती,
रा. उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी
ह.मु. शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे

नि.अ. नाथराव

दावा :— सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत

## वादी आपले वादपत्र प्रतिवादींच्या विरुध्द खालील विनंतीपुर्वक प्रमाणे दाखल करीत आहे.

1. हे की, प्रस्तुत प्रकरणातील वादी व प्रतिवादी हे एकत्रित हिंदु कुंटुबाचे घटक असून वादी व प्रतिवादी क्र. 3 हे आपसात सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र. 1 व 2 हे त्यांचे आई वडील आहेत. प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचा दुसरा मुलगा नामे मनोहर गोविंदराव नागरगोजे याचे निधन झालेले आहे.

2. हे की, मौ. वरवटी ता.अंबाजोगाई जि.बीड शिवारातील वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्या एकत्रित कुंटुबाची वडीलोपार्जित शेत जमिन मिळकती खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | सर्व्हे नं. /गट नं. | क्षेत्र | आकार | कोणाच्या नावे आहे |
|---|---|---|---|---|
| 1 | 400 | 00 हे. 52 आर | 00 रु. 70 पै | प्रतिवादी क्र. 2 |
| 2 | 183 | 00 हे. 54 आर | 00 रु. 25 पै | प्रतिवादी क्र. 2 |
| | एकुण | 01 हे. 06 आर | 00 रु. 95 पै | |

वर नमुद मिळकतीस यापुढे दाव्यात ''वादग्रस्त मिळकत'' असे संबोधण्यात येते

3. हे की, वाद दाव्यातील वादग्रस्त मिळकतीवर वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 5 यांचा एकत्रित कुंटुबाचा संयुक्तिक ताबा असून वादग्रस्त मिळकत ही एकत्रित कुंटुबाची वडीलोपार्जित मिळकत असून सदरील मिळकतींबाबत अद्यापपावेतो वादी व प्रतिवादी यांच्यात कसल्याही प्रकारच्या वाटण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे वादीने दिनांक 25/01/2026 रोजी प्रतिवादीनां वादग्रस्त मिळकतीच्या सरसनिरस मानाने वाटण्या करुन स्वंतत्र ताबा मागितला असता प्रतिवादीनीं त्यास स्पष्ट नकार देवुन वादीनां वादग्रस्त मिळकतीतुन बेदखल करण्याची व वादग्रस्त मिळकतीच्या 7/12 व महसुली अभिलेखात प्रतिवादीं क्र. 1 यांची नावे असल्याचा गैरफायदा घेवुन वादग्रस्त जमिन गट नं. 400 मधील जमिन इतरांस विक्री करण्याची धमकी दिली तसेच आमच्या नावे असलेली सर्व वादग्रस्त मिळकत आम्ही विकुन टाकणार आहोत तुम्हांला काय ते कर असे स्पष्टपणे सांगितले. करीता वादीस प्रतिवादीं विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण हे दिनांक 25/01/2026 रोजी घडले आहे.



गि.अ. गायराव

4. हे की, वादग्रस्त मिळकत ही मौजे वरवटी ता.अंबाजोगाई जि.बीड येथे मा. न्यायालयाच्या अधिकार कक्षेतील असल्याने प्रस्तुतचा दावा चालविण्याचा व त्यावर निर्णय देण्याचा अधिकार मा. न्यायालयास आहे.

5. हे की, वादीचा दावा वाटणी करुन ताबा मिळणे बाबत असल्याने वादीने दाव्याचे मुल्यांकन सुधारीत मुंबई कोर्ट फिस अधिनियमातील तरतुदी नुसार शेतजमिनीचे आकार 00 रु. 95 पै च्या 200 पट 190/- रुपये केलेले

असून त्यावर वादीच्या 1/3 हिस्सा 63.33/- रुपये होत असून आवश्यक ती कोर्ट फिस 200/- रुपये दिलेली आहे जी योग्य व पुरेशी आहे.

## तरी विनंती की,

वादीचा दावा प्रतिवादी विरुध्द खालीलप्रमाणे खर्चासह डिक्री करण्यात यावा.

अ) वादींच्या दाव्याच्या कलम नं. 2 मध्ये दर्शविलेल्या वादंग्रस्त मिळकतीतील वादींचा कायदेशिररित्या असणारा वादींचा कायदेशिर हिस्सा वाटुन. देवुन त्यावर वादींचा स्वतंत्र ताबा करुन देण्यात यावा.

ब) वादी अन्य ज्या कायदेशिर मागणीचा हक्कदार असेल ते वादींच्या हक्कात व प्रतिवादीच्या विरुध्द मंजुर करण्यात यावा.

दिनांक :– 2/02/2026
स्थळ :– अंबाजोगाई

वादी

गो. श्री. नाथराव

नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड

## सत्यापन

प्रस्तुतच्या दाव्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर आम्ही समजुन उमजनु तसदिका केल्या आहेत

दिनांक :– 2/02/2026
स्थळ :– अंबाजोगाई

वादी

गो. श्री. नाथराव

नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड

मार्फत

ॲड. व्हि.डी.शिंदे (चनईकर)
ॲड. व्हि.बी.भुरे
अंबाजोगाई